श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित,

# श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

(कला आणि विज्ञान-कनिष्ठ आणि वरिष्ठ)
पोस्ट बॉक्स नंबर ४ मु.पो. बार्शी-४१३४११ जि. सोलापूर (महाराष्ट्र)
नॅक पुनर्मुल्यांकन ग्रेड : "अ"
प्राचार्य डॉ.प्रकाश थोरात (एम.एस्सी.,एम.फिल.,पीएच.डी.)

कार्यालय : (०२१८४) २२२३८२ ● फॅक्स : (०२१८४) २२२३८२ E-mail : ssmb_barshi@rediffmail.com

|| श्रद्धावान लभते ज्ञानम् ||

संस्थापक:कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे

जा.क्र. श्रीशिमबा/वरिष्ठ/848 दिनांक 01 - 03 -२०१७

प्रति,
**मा.संचालक,**
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
सोलापूर विद्यापीठ,सोलापूर.

विषयः- "मराठी भाषा गौरव दिन-२०१७" अहवाल स्विकारणेबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन विनंती की, या महाविद्यालयातील मराठी विभागाच्यावतीने "मराठी भाषा गौरव दिन" दि.२० ते २७ फेब्रुवारी,२०१७ दरम्यान विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. त्याचा सविस्तर अहवाल छायाचित्र व सदर कार्यक्रमांची वर्तमानपत्रातून झालेली प्रसिध्दीची कात्रणे या सोबत जोडून पाठवित आहोत.

कृपया स्विकार व्हावा ही विनंती.

कळावे,

आपले विश्वासू,

(प्रा.डॉ.भारती रेवडकर)
प्रोफेसर व मराठी विभाग प्रमुख

(डॉ.प्रकाश थोरात)
प्राचार्य
श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

सोबतः- उपरोक्त.

**श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,बार्शी संचलित**

# श्री शिवाजी महाविद्यालय,बार्शी.

## मराठी विभाग

## "मराठी भाषा गौरव दिन-२०१७"

## "अहवाल"

श्री शिवाजी महाविद्यालय,बार्शी.जि.सोलापूर येथील मराठी विभागाच्यावतीने "मराठी भाषा गौरव दिन-२०१७" निमित्त दि.२० ते २७ फेब्रुवारी,२०१७ या सप्ताहामध्ये मराठी भाषा समृध्दीसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाबाबतचा अहवाल पुढील प्रमाणे सादर करत आहोत.

दि.२० फेब्रुवारी,२०१७ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध विषयावर निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ही निबंध स्पर्धा प्रामुख्याने पुढील विषयांच्या माध्यमातून पार पडली.

१) मराठी असे आमुची मायबोली

२) माझा आवडता साहित्यिक

३) माझा आवडता साहित्य प्रकार

४) मराठी भाषेतील साहित्य

या विषयांवर ही स्पर्धा खूप मोठया प्रतिसादामध्ये संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये एकूण ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदर स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले.

### "निबंध स्पर्धा निकाल"

| | | | |
|---|---|---|---|
| * **प्रथम क्रमांक** | : | देवकन्या ज्ञानदेव खुळे | बी.ए.भाग.२ |
| * **द्वितीय क्रमांक** | : | शुभांगी रमेश पाटील | बी.ए.भाग.२ |
| * **तृतीय क्रमांक** | : | प्रमोद शिवशरण बनसोडे | बी.ए.भाग.१ |
| * **उत्तेजनार्थ** | १) | कलांजली रामेश्वर ठोंगे | बी.ए.भाग.१ |
| | २) | अपर्णा नवनाथ दळवी | बी.ए.भाग.१ |

दि.२१ फेब्रुवारी,२०१७ रोजी पर्यायी शब्दलेखन ही स्पर्धा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेमध्ये एकूण २७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना काळाच्या प्रवाहात दुर्लक्षित झालेल्या शब्दांची नव्याने ओळख व्हावी आणि जुन्या शब्दांचा पुन्हा नव्याने वापर केला जावा. या अनुषंगाने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले.

### "लोप पावत चालले शब्दलेखन(ग्रामीण बोलीतील शब्द संकलन) स्पर्धा निकाल"

| | | | |
|---|---|---|---|
| * **प्रथम क्रमांक** | : | आश्विनी चंद्रकांत वीर | बी.ए.भाग.१ |
| * **द्वितीय क्रमांक** | : | मिलिंद खंडू राजभोज | बी.ए.भाग.१ |
| | : | हर्षदा राजेंद्र भालेकर | बी.ए.भाग.१ |
| * **तृतीय क्रमांक** | : | रेखा विष्णू शिंदे | एम.ए.भाग.२ |
| * **उत्तेजनार्थ** | १) | ऋतुजा राजीव लोंढे | बी.ए.भाग.१ |
| | २) | रेणुका रमेश जोशी | बी.ए.भाग.१ |
| | | दुर्गा मन्मथ केवटे | बी.ए.भाग.१ |

दि.२२ फेब्रुवारी,२०१७ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध ग्रंथांचा परिचय व्हावा म्हणून ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते. वाचन हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग व्हावा आणि त्यांनी वाचनाची अभिरुची जोपासावी या अनुषंगाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश थोरात यांच्या शुभहस्ते सदर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले होते. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा.महादेव धावणे,पर्यवेक्षक प्रा.कल्याण घळके,महाविद्यालयाचे प्रबंधक श्री.प्रमोद जाधव,मराठी विभागाचे विभाग प्रमुख प्रो.डॉ.भारती रेवडकर,कार्यक्रम समन्वयक डॉ.बिरा पारसे, सह समन्वयक प्रा.डॉ.रविकांत शिंदे, ग्रंथपाल श्री.माधव टिपरसे व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि.२३ फेब्रुवारी,२०१७ रोजी संगमेश्वर महाविद्यालय सोलापूरचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.महादेव देशमुख यांचे "लोक जीवनातील म्हणी व वाक्प्रचार यांचे स्थान आणि बोली" या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश थोरात हे होते. मराठी भाषेच्या संवर्धनात म्हणी व वाक्प्रचार यांनी कायमच मोलाची भूमिका बजावलेली आहे. त्यांचे जतन भाषेच्या संवर्धनासाठी महत्वाचे असून म्हणी वाक्प्रचारांचे जतन म्हणजेच एका अर्थाने भाषेचे जतन आहे. असा आशय त्यांच्या व्याख्यानातून मांडला गेला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे म्हणी आणि वाक्प्रचाराचे सादरीकरण केले. यामध्ये प्रामुख्याने संध्या जयराम काळे,आरती कोले,गणेश जाधव आदि विद्यार्थ्यांनी अत्यंत दुर्मिळ अशा म्हणी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. या विद्यार्थ्यांना विशेष प्रमाणपत्र देऊन यावेळी गौरविण्यात आले.

दि.२५ फेब्रुवारी,२०१७ रोजी "म्हणी व वाक्प्रचार संकलन" या विषयाच्या स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सदर स्पर्धांमध्ये २५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवुन दुर्मिळ होत चाललेल्या असंख्य म्हणी आणि वाक्प्रचारांचे अत्यंत वेगळ्या पध्दतीने संकलन केले. या पुढच्या काळात व्यावहारिक जीवनात या म्हणी आणि वाक्प्रचारांचे उपयोजन होण्याच्या अनुषंगाने या स्पर्धा उपयुक्त ठरतील असे वाटते. या स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले.

## "वाक्प्रचार संकलन"
## स्पर्धा निकाल

| | | | |
|---|---|---|---|
| * **प्रथम क्रमांक** | : | भाग्यश्री रोहिदास मुठाळ | बी.ए.भाग.१ |
| * **द्वितीय क्रमांक** | : | हर्षदा राजेंद्र भालेकर | बी.ए.भाग.१ |
| * **तृतीय क्रमांक** | : | किसन बाबासाहेब मोरे | एम.ए.भाग.२ |
| * **उत्तेजनार्थ** | १) | सुप्रिया खिंडकर | बी.ए.भाग.१ |
| | २) | रेश्मा रोहिदास खबाले | बी.ए.भाग.१ |

## "म्हणी संकलन"
## स्पर्धा निकाल

| | | | | |
|---|---|---|---|---|
| * | प्रथम क्रमांक | : | भगवती मधुकर गिरी | एम.ए.भाग.२ |
| * | द्वितीय क्रमांक | : | पूजा सोमनाथ दाभाडे | बी.ए.भाग.१ |
| * | तृतीय क्रमांक | : | पूजा सुनिल खळदकर | बी.ए.भाग.१ |
| * | उत्तेजनार्थ | १) | ज्योती दत्तात्रय वाघमारे | एम.ए.भाग.१ |
| | | २) | सुवर्णा सतिश चिखले | बी.ए.भाग.१ |

दि.२७ फेब्रुवारी,२०१७ रोजी कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन विशेष कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले होते. या कवी संमेलनासाठी विशेष कवींना आमंत्रित करण्यात आलेले होते. यामध्ये प्रामुख्याने कवी प्रा.अशोक वाघमारे,कवी मुकुंदराज कुलकर्णी,कवी दत्ता गोसावी,कवी प्रकाश गव्हाणे आदि कवी सहभागी झाले होते. या कवींनी सामाजिक,पर्यावरण तथा निसर्गविषयक जाणीवांनी समृध्द अशा कविता सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांना कवी आणि कविता या अनुषंगाने मराठी भाषेचे मोठेपण जाणवुन देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी खंडू रमेश डोईफोडे आणि गजानन शिरीष दहिहांडे या विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सदर विद्यार्थी आपल्या वक्तृत्वाच्या माध्यमातून अखंड महाराष्ट्रभर मराठी भाषेचा विशेष प्रयत्नशील असतात. मराठी भाषेच्या समृध्दीसाठी त्यांच्याकडून सातत्याने प्रयत्न होत असतो. महाविद्यालयीन पातळीवरील वक्तृत्व आणि तत्सम अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी उत्तुंग यश संपादित केले आहे. त्यांचे कार्य या पुढेही अधिक जोमाने सुरु रहावे आणि मराठी भाषेचा प्रसार अधिक तिव्रतेने व्हावा हा या सत्कारामागचा विशेष उद्देश होता. त्यांच्या कर्तृत्वातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या अनुषंगाने हा सत्कार करण्यात आला.

कुसुमाग्रजांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना त्यांच्या कवितांची एक अनोखी ओळख व्हावी म्हणून त्यांच्या कवितांवर आधारीत पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश थोरात,महाविद्यालयाचे प्रबंधक श्री.प्रमोद जाधव,मराठी विभागाचे विभाग प्रमुख प्रो.डॉ.भारती रेवडकर,महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.सुर्यकांत शिंदे,कार्यक्रम समन्वयक डॉ.बिरा पारसे, सह समन्वयक प्रा.डॉ.रविकांत शिंदे व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

मराठी विभागप्रमुख
पीएच. डी. संशोधन सुविधा केंद्र,
पदवी व पदव्युत्तर केंद्र,
श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

प्राचार्य
श्री शिवाजी महाविद्यालय,बार्शी

सकाळ
सोलापूर, गुरुवार
२३ फेब्रुवारी २०१७
२

# मराठी भाषा दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**बार्शी, ता. २२ :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने प्रसिद्ध कवी कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचा २७ फेब्रुवारी जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त महाविद्यालयात २७ फेब्रुवारीपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित ग्रंथप्रदर्शनाचे उद्‍घाटन प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी कला विभागाच्या समन्वयक डॉ. भारती रेवडकर, डॉ. बिरा पारसे, डॉ. रविकांत शिंदे, ग्रंथपाल टिपरसे, प्रा. धावणे, प्रा. घळके यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते. हे ग्रंथप्रदर्शन महाविद्यालयाच्या ग्रंथालयातच आयोजित केले असून, यात मराठी भाषेतील विविध साहित्यांतील पुस्तकांचे प्रदर्शन मांडले आहे. महाविद्यालयातील ग्रंथालयात हजारो पुस्तके आहेत; पण मराठी भाषेला समृद्ध करणारी उत्तम अशी साहित्यातील निवडक पुस्तके विद्यार्थ्यांना अभ्यासता यावीत म्हणून हा उपक्रम राबवण्यात आला आहे. तसेच पुढील सात दिवस महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने बोलीभाषेतील म्हणी व वाक्यप्रचार, एका शब्दासाठी अनेक शब्द अशा संकलनात्मक प्रकल्पाकरिता विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. मराठी भाषेच्या संवर्धन, प्रचार व प्रसारासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये निबंध स्पर्धेचेही आयोजन केले आहे. मराठी असे आमची मायबोली, माझा आवडता साहित्यिक, आवडता साहित्य प्रकार या विषयांवर ही निबंध स्पर्धा होत आहे. तर गुरुवारी (ता. २३) 'लोकजीवनातील म्हणी व वाक्यप्रचार यांचे स्थान आणि बोलीभाषा' या विषयावर डॉ. महादेव देशमुख यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. तर शनिवारी (ता. २५) कुसुमाग्रजांच्या कवितेवर आधारित पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सोमवारी (ता. २७) निमंत्रितांच्या कवी संमेलनाचे आयोजन करून मराठी दिन साजरा करण्यात येणार आहे. या वेळी मराठी भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान होईल.




**बार्शी : श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित ग्रंथप्रदर्शनाच्या उद्‍घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, डॉ. भारती रेवडकर, डॉ. बिरा पारसे, डॉ. रविकांत शिंदे, ग्रंथपाल टिपरसे आदी.**

सकाळ | शनिवार, २५ फेब्रुवारी २०१७

# म्हणी, वाक्प्रचार हे मानवी मूल्यांचे प्रवाहक

## डॉ. देशमुख : शिवाजी महाविद्यालयातील व्याख्यानात मत

**बार्शी, ता. २४ :** मराठी भाषेला समृद्ध लोकपरंपरा आणि संस्कृती लाभलेली आहे. या भाषेतील म्हणी आणि वाक्प्रचार खऱ्या अथनि मानवी मूल्यांचे प्रवाहक आहेत. त्यांचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन ही आपली जबाबदारी आहे, असे मत संगमेश्वर महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'लोकजीवनातील म्हणी व वाक्प्रचार आणि बोली' यावरील व्याख्यानात ते बोलत हाते. प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, "मराठी भाषेच्या संवर्धनात म्हणी व वाक्प्रचार यांनी कायमच मोलाची भूमिका बजावलेली आहे. त्यांचे जतन भाषेच्या संवर्धनासाठी महत्त्वाचे असून म्हणी, वाक्प्रचाराचे जतन म्हणजेच एका अथनि भाषेचे जतन आहे."



**बार्शी : मराठी भाषा गौरव दिन सप्ताहानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. महादेव देशमुख. सोबत (डावीकडून) डॉ. रविकांत शिंदे, प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, डॉ. भारती रेवडकर.**

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात म्हणाले, "भाषा ही जगण्याचे अपरिहार्य साधन आहे. मराठीची अस्मिता बाळगतानाच तिच्या वापराबाबत आग्रही राहायला हवे. आपली भाषा हीच अन्य भाषांच्या आत्मसाताचे माध्यम असते." कला समन्वयक व मराठी विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. भारती रेवडकर यांनी प्रास्ताविक केले. छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रा. डॉ. रविकांत शिंदे यांनी आभार मानले.

लोकमत

सोलापूर, शनिवार,
दि. २५ फेब्रुवारी २०१७ | ३

# मराठी भाषेचे संवर्धन व्हावे: महादेव देशमुख



बार्शी येथील महाविद्यालयात आयोजित व्याखान्यात मार्गदर्शन करताना डॉ. महादेव देशमुख. यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, प्रा.डॉ. भारती रेवडकर प्रा. डॉ. रविकांत शिंदे.

**बार्शी :** मराठी भाषेला समृध्द लोकपरंपरा आणि संस्कृती लाभलेली आहे. या भाषेतील म्हणी आणि वाक्प्रचार खऱ्या अर्थाने मानवी मूल्यांचे प्रवाहक असल्याने त्यांचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन ही आपली सर्वांची जबाबदारी आहे, असे मत संगमेश्वर महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित लोकजीवनातील म्हणी व वाक्प्रचार आणि बोलीभाषा या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात होते. मराठी भाषेच्या संवर्धनात म्हणी व वाक्प्रचार यांनी कायमच मोलाची भूमिका बजावलेली आहे. त्यांचे जतन भाषेच्या संवर्धनासाठी महत्त्वाचे असून म्हणी, वाक्प्रचाराचे जनत म्हणजेच एका अर्थाने भाषेचे जतन, अशी भूमिका डॉ. देशमुख यांनी मांडली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात यांनी भाषा ही जगण्याचे अपरिहार्य साधन आहे. मराठीची अस्मिता बाळगतानाच तिच्या वापराबाबत आग्रही राहायला हवे, असे मत मांडले. आभार प्रा. डॉ. रविकांत शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. (प्रतिनिधी)

सोलापूर
तरुण भारत
www.tarunbharatsolapur.com

सोलापूर, शनिवार २५ फेब्रुवारी २०१७ १२



मराठी भाषा गौरवदिन सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. महादेव देशमुख. यावेळी डॉ. रविकांत शिंदे, प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, प्रा.डॉ. भारती रेवडकर.

## मराठी भाषेतील म्हणी आणि वाक्यप्रचार मानवी मूल्यांचे प्रवाहक : डॉ. देशमुख

**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी**

मराठी भाषेला समृद्ध लोकपरंपरा आणि संस्कृती लाभलेली आहे. या भाषेतील म्हणी आणि वाक्यप्रचार खऱ्या अर्थाने मानवी मूल्यांचे प्रवाहक असल्याने त्यांचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन ही आपली सर्वांची जबाबदारी आहे, असे मत डॉ. महादेव देशमुख यांनी व्यक्त केले. महाविद्यालयातील मराठी विभागाच्यावतीने मराठी भाषा गौरवदिन या निमित्ताने आयोजित लोकजीवनातील म्हणी व वाक्यप्रचार आणि बोली या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात हे होते. मराठी भाषेच्या संवर्धनात म्हणी व वाक्यप्रचार यांनी कायमच मोलाची भूमिका बजावलेली आहे. त्यांचे जतन भाषेच्या संवर्धनासाठी महत्त्वाचे असून म्हणी, वाक्यप्रचाराचे जतन म्हणजेच एका अर्थाने भाषेचे जतन अशी भूमिका डॉ. देशमुख यांनी मांडली. प्रस्ताविक करताना कला समन्वयक व मराठी विभागाच्या प्रमुख प्रा.डॉ. भारती रेवडकर यांनी केले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय व आभार प्रा.डॉ. रविकांत शिंदे यांनी मानले.

लोकमत
www.lokmat.com

सोलापूर, शनिवार,
दि. २५ फेब्रुवारी २०१७

## शिवाजी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**बार्शी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने प्रसिद्ध कवी कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचा २७ फेब्रुवारी जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. या निमित्तने माहविद्यालयात २० फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून याच कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कला विभागाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती रेवडकर, प्रा. डॉ. बिरा पारसे, प्रा. डॉ. रविकांत शिदे, ग्रंथपाल टिपरसे, प्रा. धावणे, प्रा. घळके उपस्थित होते. मराठी भाषेतील विविध साहित्यातील पुस्तकांचे प्रदर्शन मांडले आहे. सात दिवस महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने बोलीभाषेतील म्हणी व वाक्प्रचार, एका शब्दसाठी अनेक शब्द अशा संकलनात्मक प्रयत्पासाठी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. २७ फेब्रुवारी रोजी कवी संमेलनाने मराठी दिन साजरा करण्यात येणार आहे. या वेळी मराठी भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी पारितोषिक वितरण होणार आहे. (प्रतिनिधी)

सकाळ
सोलापूर, बुधवार
१ मार्च २०१७
४



बार्शी : निमंत्रितांच्या कवी संमेलनात कविता सादर करताना प्रकाश गव्हाणे. या वेळी प्रा. अशोक वाघमारे, मुकुंदराज कुलकर्णी, प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, प्रा. डॉ. भारती रेवडकर, दत्ता गोसावी.

# तिच्या डोळ्याच्या पाण्यात केव्हा बुडालो...

## बार्शीत निमंत्रितांच्या कवी संमेलनात बहारदार कविता सादर

**बार्शी, ता. २८ :** सारा सागर पार करताना मला काहीच वाटलं नाही.. तिच्या डोळ्याच्या पाण्यात केव्हा बुडालो, हे माझे मलाच कळले नाही. ही कवी प्रकाश गव्हाणे यांची प्रेमकविता, तर दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी यांच्या हस्ते विरोधात आम्ही सारे विचारांचे वारसदार, या प्रा. अशोक वाघमारे यांच्या व इतर कवींच्या कवितांचा आस्वाद महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घेतला. कवी कुसुमाग्रजांची जयंती व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने निमंत्रित कवींचे संमेलन आयोजित केले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात हे अध्यक्षस्थानी होते. कवी संमेलनास प्रा. अशोक वाघमारे, मुकुंदराज कुलकर्णी, दत्ता गोसावी, प्रकाश गव्हाणे, कला विभाग समन्वयक डॉ. भारती रेवडकर, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. सूर्यकांत शिंदे, कार्यक्रम समन्वयक डॉ. बिरा पारसे, सहसमन्वयक डॉ. रविकांत शिंदे, प्रा. गवळी, प्रा. विजया जगताप, प्रा. अर्चना कांबळे आदी उपस्थित होते. २७ फेब्रुवारी कवी कुसुमाग्रज यांची जयंती ही मराठी भाषा दिन म्हणून साजरी करण्यात येते. यानिमित्त निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. या वेळी सादर झालेल्या प्रेमकविता, विद्रोही कविता तसेच श्री राम परमीट रूम या सामाजिक भाष्य करणाऱ्या कवितांना विद्यार्थ्यांनी भरभरून दाद दिली.

पान २ वर »

### स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी

**निबंध स्पर्धा : देवकन्या खुळे, शुभांगी पाटील, प्रमोद बनसोडे, बालाजी ठोंगे, अपर्णा दळवी. पर्यायी शब्द/बोलीभाषेतील शब्द संकलन : अश्विनी वीर, मिलिंद राजभोज, हर्षदा भालेकर, रेश्मा शिंदे, ऋतुजा लोंढे, रेणुका जोशी, दुर्गा कपटे. म्हणी संकलन : भगवती गिरी, पूजा दाभाडे, पूजा खळदकर, ज्योती वाघमारे, सुवर्णा चिखले. वाक्प्रचार : भाग्यश्री मुठाळ, हर्षदा भालेकर, किसन मोरे, सुप्रिया खिंडकर, रेश्मा खबाले. उत्स्फूर्त म्हणी सादरीकरण : संध्या काळे, आरती कोले, स्वप्नील जाधव. तर मराठी भाषा संवर्धनासाठी विशेष प्रयत्न करणारे व्याख्याते खंडू डोईफोडे व मंगेश दहीहंडे यांचाही सत्कार करण्यात आला.**

# तिच्या डोळ्याच्या पाण्यात केव्हा बुडालो...

» पान १ वरून

या वेळी बोलताना प्रा. अशोक वाघमारे यांनी, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी चळवळ उभारणे आवश्यक आहे. यासाठी परिसंवादाचे आयोजन करून चर्चा घडवून आणली पाहिजे. या कामासाठी मराठी विभाग व डॉ. भारती रेवडकर यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी केली. डॉ. भारती रेवडकर म्हणाल्या, मराठी दिन हा केवळ साजरा न करता मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वच स्तरांतून प्रयत्न होणे गरजेचे आहे. आज ग्रामीण बोलीभाषेतील अनेक शब्द लोप पावत चालले आहेत. मानवी जीवनात आई, मातृभूमी व मातृभाषा ही महत्त्वाची स्थळे आहेत. सर्वांनीच मराठी भाषा बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे. प्रारंभी, कवी कुसुमाग्रजांच्या विविध कविता व फोटोंच्या पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले, तसेच मराठी विभागातील भित्तिपत्रकाचेही उद्घाटन करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली.

दैनिक दिव्य मराठी
सोलापूर, बुधवार, १ मार्च २०१७ | ३

मराठी भाषा गौरव दिन | जिल्ह्यात विविध संस्था, संघटनांकडून कार्यक्रमांचे आयोजन

# बार्शीमध्ये कवितेतून विडंबनात्मक फटकारे, सामाजिक भाष्य

## शिवाजी महाविद्यालयात घेतल्या विविध स्पर्धा

प्रतिनिधी । बार्शी

सारा सागर पार करताना मला काहीच वाटलं नाही.... तिंच्या डोळ्यांच्या पाण्यात केव्हा बुडालो हे माझे मलाच कळले नाही... या कवी प्रकाश गव्हाणे यांच्या प्रेम कवितेपासून विद्रोही, सामाजिक भाष्य करणारी श्री राम परमिट रुम आणि विडंबनात्मक कवितांना विद्यार्थ्यांनी भरभरून दाद दिली. कवी कुसुमाग्रज यांची जयंती व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाने निमंत्रित कवींचे संमेलन आयोजिले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात हे होते. यात प्रा.अशोक वाघमारे, मुकुंदराज कुलकर्णी, दत्ता गोसावी, प्रकाश गव्हाणे, कला विभाग समन्वयक प्रा. डॉ. भारती रेवडकर, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. सूर्यकांत शिंदे, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. बिरा पारसे, सहसमन्वयक प्रा. डॉ. रविकांत शिंदे, प्रा. गवळी, प्रा. विजया जगताप, प्रा. अर्चना कांबळे यांचा सहभाग होता.

प्रा. अशोक वाघमारे म्हणाले, 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी चळवळ उभारणे आवश्यक आहे. यासाठी परिसंवादाचे आयोजन करून चर्चा घडवून आणावी.' अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. थोरात यांनी शालेय जीवनात अभ्यासलेल्या कवी कुसुमाग्रजांच्या कवितांना उजाळा दिला. आपणच आपल्या मायबोलीपासून लांब जातोय का याचा विचार करावा, असे त्यांनी म्हटले. मराठी विभागाने मागील आयोजिलेल्या निबंध, म्हणी, बोली भाषेतील शब्द संकलन, पर्यायी शब्द, वाक्प्रचार संकलन या स्पर्धेचे कौतुक केले. प्रारंभी पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.



बार्शी येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित निमंत्रितांच्या कवी संमेलनात प्रकाश गव्हाणे यांनी कविता सादर केल्या. यावेळी प्रा. अशोक वाघमारे उपस्थित होते.

### मराठी भाषा जगणे समृद्ध करते : प्रा. रेवडकर

**मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. आज ग्रामीण बोली भाषेतील अनेक शब्द लोप पावत चालले आहेत. मानवी जीवनात आई, मातृभूमी व मातृभाषा ही महत्त्वाची स्थळे आहेत. सर्वांनीच मराठी भाषा बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे. मराठी भाषा जगणे समृद्ध करते, त्यामुळे ही भाषा शिकली पाहिजे, असे मत प्रा. डॉ. भारती रेवडकर यांनी व्यक्त केले.**

### स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी

**निबंध स्पर्धा : देवकन्या खुळे, शुभांगी पाटील, प्रमोद बनसोडे, बालाजी ठोंगे, अपर्णा दळवी. पर्यायी शब्द, बोली भाषेतील शब्द संकलन : अश्विनी वीर, मिलिंद राजभोज, हर्षदा भालेकर, रेश्मा शिंदे, ऋतुजा लोढे, रेणुका जोशी, दुर्गा कपटे. म्हणी संकलन : भगवती गिरी, पूजा दाभाडे, पूजा खळदकर, ज्योती वाघमारे, सुवर्णा चिखले. वाक्प्रचार : भाग्यश्री मुठाळ, हर्षदा भालेकर, किसन मोरे, सुप्रिया खिंडकर, रेश्मा खबाले. उत्स्फूर्त म्हणी सादरीकरण : संध्या काळे, आरती कोले, स्वप्नील जाधव. खंडू डोईफोडे व मंगेश दहिहांडे यांचा सत्कार झाला.**

लोकमत सोलापूर, बुधवार, दि. १ मार्च २०१७ २

# बार्शीच्या शिवाजी महाविद्यालयात कविसंमेलन



निमंत्रितांच्या कविसंमेलनात कविता सादर करताना प्रकाश गव्हाणे. यावेळी डावीकडून प्रा. अशोक वाघमारे, कुमुंदराज कुलकर्णी, प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, प्रा. डॉ. भारती रेवडकर, दत्ता गोसावी.

**बार्शी :** सारा सागर पार करताना मला काहीच वाटलं नाही... तिच्या डोळ्याच्या पाण्यात केव्हा बुडालो हे माझे मलाच कळले नाही... या कवी प्रकाश गव्हाणे यांच्या प्रेमकवितांपासून ते दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी यांच्या हस्ते विरोधात आम्ही सारे विचारांचे वारसदार अशी प्रा. अशोक वाघमारे यांची व इतर कवींच्या कवितांचा आस्वाद महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घेतला.

निमित्तहोते कवी कुसुमाग्रज यांची जयंती व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने निमंत्रित कवींचे संमेलन आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात हे होते. कविसंमेलनास प्रा.अशोक वाघमारे, मुकुंदराज कुलकर्णी, दत्ता गोसावी, प्रकाश गव्हाणे, कला विभाग समन्वयक तथा मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.भारती रेवडकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.सूर्यकांत शिंदे, कार्यक्रम समन्वयक प्रा.डॉ.बिरा पारसे, सहसमन्वयक प्रा.डॉ.रविकांत शिंदे, प्रा.गवळी, प्रा.विजया जगताप, प्रा.अर्चना कांबळे आदी उपस्थित होते. २७ फेब्रुवारी कवी कुसुमाग्रज यांची जयंती ही मराठी भाषा दिन म्हणून साजरी करण्यात येते. याच निमित्ताने निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी सादर झालेल्या प्रेमकविता, विद्रोही कविता तसेच श्रीराम परमिट रुम या सामाजिक भाष्य करणाऱ्या कवितांना विद्यार्थ्यांनी भरभरुन दाद दिली.

प्रा.अशोक वाघमारे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी चळवळ उभारणे आवश्यक आहे. यासाठी परिसंवादाचे आयोजन करुन चर्चा घडवून आणली पाहिजे. या कामासाठी मराठी विभाग व डॉ.भारती रेवडकर यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली. तर प्रा.डॉ.भारती रेवडकर म्हणाल्या मराठी दिन हा केवळ साजरा न करता मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. आज ग्रामीण बोलीभाषेतील अनेक शब्द लोप पावत चालले आहेत. मानवी जीवनात आई, मातृभूमी व मातृभाषा ही महत्वाची स्थळे आहेत. सर्वांनीच मराठी भाषा बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे. मराठी भाषा जगणे समृध्द करते म्हणून ही भाषा शिकली पाहिजे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात शालेय जीवनातील कवी कुसुमाग्रजांच्या अभ्यासलेल्या कवितांना उजाळा दिला. आपणच आपल्या मायबोलीपासून लांब जातोय का याचा विचार करावा. मराठी विभागाच्या वतीने मागील आठ दिवसात आयोजित केलेल्या निबंध, म्हणी, बोलीभाषेतील शब्द संकलन, पर्यायी शब्द, वाक्प्रचार संकलन या स्पर्धांचे कौतुक केले. प्रारंभी कवी कुसुमाग्रजांच्या विविध कविता व फोटोंचे पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले तसेच मराठी विभागातील भित्तीपत्रकाचेही उद्घाटन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. (प्रतिनिधी)

## स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी....

◆ निबंध स्पर्धा देवकन्या खुळे, शुभांगी पाटील, प्रमोद बनसोडे, बालाजी ठोंगे, अपर्णा दवळी. पर्यायी शब्द/बोलीभाषेतील शब्द संकलन अश्विनी वीर, मिलिंद राजभोज, हर्षदा भालेकर, रेश्मा शिंदे, ऋतुजा लोढे, रेणुका जोशी, दुर्गा कपटे. म्हणी संकलन भगवती गिरी, पूजा दाभाडे, पूजा खळदकर, ज्योती वाघमारे, सुवर्णा चिखले वाक्प्रचार भाग्यश्री मुठाळ, हर्षदा भालेकर, किसन मोरे, सुप्रिया खिडकर, रेश्मा खबाले. उत्स्फूर्त म्हणी सादरीकरण संध्या काळे, आरती कोले, स्वप्निल जाधव. तर मराठी भाषा संवर्धनासाठी विशेष प्रयत्न करणारे व्याख्याते खंडू डोईफोडे व मंगेश दहीहांडे यांचाही सत्कार करण्यात आला.



पुढारी | गुरुवार
२ मार्च २०१७

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त बार्शीत कविसंमेलन



**बार्शी : निमंत्रितांच्या कविसंमेलनात कविता सादर करताना प्रकाश गव्हाणे. यावेळी डावीकडून प्रा. अशोक वाघमारे, मुकुंदराज कुलकर्णी, प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात, प्रा. डॉ. भारती रेवडकर, दत्ता गोसावी.**

**बार्शी/पांगरी : वार्ताहर**

'सारा सागर पार करताना मला काहीच वाटलं नाही.... तिच्या डोळ्यांच्या पाण्यात केव्हा बुडालो हे माझे मलाच कळले नाही...' या कवी प्रकाश गव्हाणे यांच्या प्रेम कवितांपासून ते दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी यांच्या हस्ते विरोधात आम्ही सारे विचारांचे वारसदार अशी प्रा. अशोक वाघमारे यांची व इतर कवींच्या कवितांचा आस्वाद महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घेतला. कवी कुसुमाग्रज यांची जयंती व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागच्यावतीने निमंत्रित कवींचे संमेलन आयोजित केले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात होते. कवी संमेलनास प्रा.अशोक वाघमारे, मुकुंदराज कुलकर्णी, दत्ता गोसावी, प्रकाश गव्हाणे, कला विभाग समन्वयक तथा मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. भारती रेवडकर, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. सूर्यकांत शिंदे, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. बिरा पारसे, प्रा. डॉ. रविक्रांत शिंदे, प्रा. गवळी, प्रा. विजया जगताप, प्रा. अर्चना कांबळे उपस्थित होते. २७ फेब्रुवारी कवी कुसुमाग्रज यांची जयंती ही मराठी भाषादिन म्हणून साजरी करण्यात येते. याचनिमित्ताने निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी सादर झालेल्या प्रेम कविता, विद्रोही कवितातांना विद्यार्थ्यांनी भरभरुन दाद दिली.

प्रा. अशोक वाघमारे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी चळवळ उभारणे आवश्यक आहे. यासाठी परिसंवादाचे आयोजन करुन चर्चा घडवून आणली पाहिजे. या कामासाठी मराठी विभाग व डॉ. भारती रेवडकर यांनी पुढकार घ्यावा, अशी मागणी केली. तर प्रा. डॉ. भारती रेवडकर म्हणाल्या मराठीदिन हा केवळ साजरा न करता मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वच स्तरांतून प्रयत्न होणे गरजेचे आहे. आज ग्रामीण बोली भाषेतील अनेक शब्द लोप पावत चालले आहेत. मानवी जीवनात आई, मातृभूमी व मातृभाषा ही महत्त्वाची स्थळे आहेत. सर्वांनीच मराठी भाषा बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे. मराठी भाषा जगणे समृध्द करते म्हणून ही भाषा शिकली पाहिजे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात शालेय जीवनातील कवी कुसुमाग्रजांच्या अभ्यासलेल्या कवितांना उजाळा दिला.

**स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी**

निबंध स्पर्धा : देवकन्या खुळे, शुभांगी पाटील, प्रमोद बनसोडे, बालाजी ठोंगे, अपर्णा दवळी. पर्यायी शब्द/बोली भाषेतील शब्द संकलन : अश्विनी वीर, मिलिंद राजभोज, हर्षदा भालेकर, रेश्मा शिंदे, ऋतुजा लोढे, रेणूका जोशी, दुर्गा कपटे. म्हणी संकलन : भगवती गिरी, पूजा दाभाडे, पूजा खळदकर, ज्योती वाघमारे, सुवर्णा चिखले वाक्यप्रचार : भाग्यश्री मुठाळ, हर्षदा भालेकर, किसन मोरे, सुप्रिया खिंडकर, रेश्मा खबाले.

उत्स्फूर्त म्हणी सादरीकरण : संध्या काळे, आरती कोले, स्वप्निल जाधव, तर मराठी भाषा संवर्धनासाठी विशेष प्रयत्न करणारे व्याख्याते खंडू डोईफोडे व मंगेश दहिहांडे यांचाही सत्कार करण्यात आला.


मराठी विभाग
"मराठी भाषा गौरव दिन"
ग्रंथ प्रदर्शन


"मराठी भाषा गौरव दिन"
ग्रंथ प्रदर्शन








"मराठी भाषा गौरव दिन"


मराठी विभाग
"मराठी भाषा गौरव दिन"
विषय : लोकजीवनातील म्हणी व वाक्प्रचार आणि बोली
प्रा. डॉ. महादेव देशमुख






"मराठी भाषा गौरव दिन"
कवी संमेलन







श्री शिवाजा महाविद्यालय, बार्शी.

मराठी विभाग

# मराठी भाषा गौरव दिन

२०१७

# पर्यायी शब्द लेखन.

KUNKULOL
OFFICE FILE
EXECUTIVE

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

# मराठी भाषा गौरव दिन

# निबंधस्पर्धा

२०१८

FILE NO.: नोंदणी

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

मराठी विभाग

# 'मराठी भाषा गौरव दिन'

# म्हणी, वाक्प्रचार संकलन

२०१८

RAJASHREE
Choice of Scholars

Fancy File Flat 222

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित



# श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी



## मराठी विभाग

## अक्षर मराठी वाङ्मय मंडळ २०१६–१७

| | |
|---|---|
| मा. प्राचार्य डॉ. प्रकाश थोरात | मार्गदर्शक |
| मा. प्रा. डॉ. भारती रेवडकर | विभाग प्रमुख |
| मा. प्रा. डॉ. बिरा पारसे | समन्वयक |
| मा. प्रा. डॉ. रविकांत शिंदे | सहसमन्वयक |
| प्रा. सूर्यकांत शिंदे | सांस्कृतिक विभाग प्रमुख |
| रणवीर राऊत | विद्यार्थी प्रतिनिधी |
| सूरज राऊत | सांस्कृतिक विभाग वि. प्रतिनिधी |
| अपर्णा दळवी | सदस्य |
| देवकन्या खुळे | सदस्य |
| तुषार गाढवे | सदस्य |
| गणेश भागवत | सदस्य |
| रेखा शिंदे | सदस्य |
| जयंत पवार | ग्रंथालय सहाय्यक |